# नि.नं. २२ खालील आदेश

(CNR NO. MHSN08009552012)

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता (येथून पुढे '**संहिता**') आदेश १ नियम १० प्रमाणे दाव्यात नवीन पक्षकार करण्याकरिता व दुरुस्तीसाठी दिलेला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, वादीने प्रस्तुतचा दावा हा वाद मिळकत प्रतिवादी क्र० २ यांच्याकडून नोंद खरेदीपत्राने कराराच्या आधारे खरेदी होऊन मिळावी याकरिता दाखल केलेला आहे. प्रस्तुत दावा दाखल करतेवेळी वादी एकत्र कुटुंब मॅनेजर म्हणून मुचंडी घराण्याचा कारभार पाहत होते व त्याकरिता त्यांनी प्रतिवादी क्र. २ कडून खरेदीपूर्व करार करुन घेतला होता. वादीचे पुढे असे कथन आहे की सन २०१६-१७ च्या दरम्यान वादी क्र. १ याने त्यांच्या इतर पाच भावांमध्ये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ८५ प्रमाणे तहसिलदांसमोर आपसात वाटप करुन घेतले आहे. सदर वाटपामध्ये वाद मिळकत ही वादीने त्यांचा भाऊ रुद्राप्पा मुचंडी याच्या हिस्स्यात घातलेले असून प्रस्तुत वादीचा त्या मिळकतीशी संबंध राहिलेला नाही. सबब वादी क्र. २ श्री. रुद्राप्पा सिद्राम मुचंडी, वय – ४६ वर्षे, धंदा – नोकरी, रा., जालिहाळ बु., ता. जत यांना वादी क्र. २ म्हणून समाविष्ट करावे असे वादीची विनंती आहे.

३. प्रतिवादी क्र. १ ने सदर अर्जास निशाणी ३७ कडे त्याचे म्हणणे देवून अर्जाला विरोध दर्शविला आहे. प्रतिवादीचे असे कथन आहे की, अर्जाच्या पुष्टयार्थ वादीने कोणतेही कागदपत्र दाखल केलेले नाहीत. दावा मिळकत ही खरेदीपत्राप्रमाणे प्रतिवादी क्र. १ च्या मालकी कब्जे वहिवाटीत असल्याने वादीचा त्याच्याशी काहीएक संबंध येत नाही. वादीने प्रस्तुतचा अर्ज केवळ प्रतिवादीस मानसिक त्रास देऊन दावा प्रलंबित ठेवण्यासाठी केलेला आहे. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. वादी व प्रतिवादींतर्फे दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रकरणातील विचाराधीन मुद्दे व त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसासहित खालीलप्रमाणे नोंदविले

आहेत.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| 1 | प्रस्तावित वादी क्र. २ यांना दाव्याच्या कामी आवश्यक पक्षकार केल्यास दावा अंतिमतः गुणदोषावर निकाली करणे सुलभ होणार आहे का ? | – ***नाही.*** |
| 2 | काय आदेश ? | – ***अर्ज नामंजूर करण्यात येतो.*** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ बाबतः**

५. वादीतर्फे सुविदय विधिज्ञ श्री. सी. एस. मठपती यांनी असा युक्तीवाद केला की, वादी क्र. १ ने वाद मिळकत ही वाटपात प्रस्तावित वादी क्र. २ याच्या नावे केलेले असल्याने त्याचा वाद मिळकतीशी काहीएक संबंध राहिला नाही. पुढे त्यांनी युक्तीवादात सांगितले की प्रस्तावित वादी क्र. २ याचा वाद मिळकतीत हक्क निर्माण झाल्याने तो दाव्यात आवश्यक पक्षकार आहे. वादीचा अर्ज मंजूर करावा अशी त्यांनी विनंती केली.

६. प्रतिवादी क्र. १ तर्फे सुविदय विधिज्ञ श्री. टी. बी. साळुंखे यांनी असा युक्तीवाद केला की, अर्जाच्या पुष्टयार्थ वादीने वाटपपत्र अथवा इतर कागदपत्र दाखल केलेली नाहीत. पुढे युक्तीवादात त्यांनी सांगितले की प्रस्तावित वादी क्र. २ हा आवश्यक पक्षकार नाही. वादीने दावा दाखल करत असतानाच सर्व आवश्यक पक्षकारांना समाविष्ट करणे गरजेचे होते. त्यामुळे वादीचा अर्ज नामंजुर करावा अशी त्यांनी विनंती केली.

७. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा हा वादीने कराराप्रमाणे खरेदीखत करुन मिळण्याकरिता व प्रतिवादी क्र. १ चे नावे प्रतिवादी क्र. २ ने करुन दिलेले खरेदीखत रद्दबातल आहे असे जाहिर होऊन मिळण्याकरिता केलेला आहे. वादीने फे. नि. ३ कडे अ क्र. १ ला दाखल केलेल्या दि. १३.०५.१९९४ रोजीच्या इसार पावतीचे अवलोकन केले असता लिहून घेणार म्हणून वादीचे नाव दिसून येते. तसेच फे. नि. ३

कडे अ. क्र. २ ला दाखल केलेल्या दि. ०७.११.१९९६ रोजीच्या खरेदीखतामध्ये देखील लिहून घेणार म्हणून वादीचे नाव आहे. पुढे फे. नि. ३ कडे अ क्र. ३ ला दाखल केलेल्या दि. ०७.११.१९९६ रोजीच्या करारावर देखील लिहून घेणार म्हणून वादीचे नाव आहे. वर नमूद केलेप्रमाणे दावा हा करारावरुन खरेदीखत करुन मिळण्यासाठी दाखल केलेला आहे व प्रस्तुत वादी हा एकमेव लिहून घेणार म्हणून पक्षकार आहे. वादीने अर्जाच्या पुष्टयार्थ कोणतीही कागदपत्रे दाखल केलेली नाहीत. अशा परिस्थितीत कराराची पुर्तता होऊन मिळण्यासाठी केलेल्या दाव्यामध्ये केवळ दावा सुरु असताना वादीने वाटप करुन दिले या करणाकरिता वादी क्र. २ हा आवश्यक पक्षकार आहे असे म्हणता येणार नाही. सबब या मुद्दयाचा निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.२ बाबत खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

अर्ज नि.नं. २२ नामंजूर करण्यात येतो.

(खुल्या न्यायालयात घोषीत)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by Shirishkumar Digambar Waghmare
DN: c=IN, o=Bombay High Court, ou=Judiciary, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=27258b50725b8ad0f02b93c79864217287a311295d93b8bfdb3e0b1ef7505488, cn=Shirishkumar Digambar Waghmare
Date: 2020.02.12 16:38:24 +05'30'

दि.१२.०२.२०२०
जत

**(शिरीषकुमार दि. वाघमारे)**
**सहदिवाणी न्यायाधीश, क. स्तर,**
**जत, जि. सांगली.**

मी प्रमाणित करतो की, या पीडीएफ फाईलमधील मजकूर व मुळ आदेशामधील मजकूर हा एकसारखा आहे.

स्टेनोग्राफरचे नांवः एम. एम. बुचडे,

कोर्टाचे नांव : एस. डी. वाघमारे,
सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर
व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी जत.

दि. १२.०२.२०२०

पिठासीन अधिकारी यांनी सही केलेली तारीखः १२.०२.२०२०

आदेश अपलोड केलेली तारीखः १२.०२.२०२०